महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था
नियामक मंडळ, पुणे यांचे कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
ई-मेलआयडी-regulatoryboard2019@gmail.com दूरध्वनी क्रमांक-०२०- २६१२१३२१/२६१२२८४६

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/नियामक मंडळ/सन २०१९/४०२९ दिनांक :- ३०/११/२०१९

विषय :- महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ बैठक दि.१४/११/२०१९.
रोखता / तरलता निधीचे प्रमाण तसेच रोखता व तरलता निधीची गुंतवणूक

तरलता निधी, रोखता निधी व तरलता निधीची गुंतवणूक याबाबत फेरविचार करण्यासाठी संस्था / फेडरेशन्स यांचेकडून पत्रव्यवहार प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने दि.१४/११/२०१९ रोजीच्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

तरलता निधीची गुंतवणूक एकूण ठेवीच्या २५% करणेबाबत नियामक मंडळाने घेतलला पूर्वीचा निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. तथापि रोखता निधी एकूण ठेवीच्या १% करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदरचा निर्णय दिनांक १ जानेवारी, २०२० पासून अंमलात येईल.

ज्या नागरी सहकारी बँकांना सलग ३ वर्षे अ लेखापरिक्षण वर्ग मिळालेला आहे व ज्या बँका रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार आर्थिकदृष्टया सक्षम व उत्तम रितीने कामकाज करणा-या आहेत अशा बँकांमध्ये बिगर कृषी पतसंस्थेस रोख राखीव निधी तथा वैधानिक तरलता निधीची गुंतवणूक करता येईल.

(मिलिंद सोबले)
सचिव, नियामक मंडळ,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
२. अध्यक्ष, नागरी / ग्रामीण / कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.,
३. अध्यक्ष, नागरी / ग्रामीण / कर्मचारी सहकारी पतसंस्थांचे सर्व फेडरेशन्स.

प्रत माहितीसाठी :-

१. मा.सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय, पुणे.
२. मा.अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था) महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. सर्व, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
४. मुख्य कार्यकारी व सचिव, दि महाराष्ट्र नागरी सहकारी बँक्स फेडरेशन लि.,
भारतीय क्रिडा मंदिर, ४ था मजला, वडाळा, मुंबई-४०० ०३१.

Scanned by CamScanner

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/नियामक मंडळ/एनपीए कालावधी/शिथिल/सन २०२२ 815 दि.१६ /०३/२०२२

## परिपत्रक

**विषय : कोविड-१९ च्या अनुषंगाने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या अनुत्पादक जिंदगी (एनपीए) वर्गीकरणाचा कालावधी शिथिल करणेबाबत.**

**संदर्भ :** १) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि.१०/११/२००४, दि.२१/१२/२००४, दि.५/२/२०११ व दि.२३/१/२०१७ रोजीचे परिपत्रक

२) महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे परिपत्रक दि.२७/३/२०२०

३) महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचेकडील दि.१/१०/२०२० चे परिपत्रक

४) महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ सभा दि.१०/३/२०२२ मधील निर्णय.

राज्यातील सहकारी पतसंस्थांना संदर्भ क्र.१ मधील दि.१०/११/२००४ चे परिपत्रकान्वये, अनुत्पादक जिंदगी (एनपीए) चे निकष लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार उत्पन्न संकल्पना, अनुत्पादक जिंदगी वर्गीकरण व तरतुदी याबाबतचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. एखाद्या कर्जखात्यावरील व्याजाचा हप्ता किंवा कर्जाचा हप्ता किंवा कर्ज व व्याजाचा हप्ता हा ठरवून दिलेल्या कालावधीनंतरही वसूल न झाल्यास असे खाते म्हणजे अनुत्पादक जिंदगी (एनपीए) होय. सदरचे एन.पी.ए. निकष केवळ कर्जासाठी लागू नसून सर्व प्रकारच्या अनुत्पादक जिंदगीसाठी लागू आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र.१ दि.२१/१२/२००४ चे परिपत्रकान्वये, अनुत्पादक जिंदगीच्या वर्गीकरणाबाबत लागू करण्यात आलेली तरतुदीची टक्केवारी विषद केलेली असून दि.५/२/२०११ च्या परिपत्रकान्वये पतसंस्थांसाठी अनुत्पादक जिंदगी ठरविण्याचा थकीत कालावधी सहामाही करण्यात आला आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील दि.२७/३/२०२० चे परिपत्रकान्वये, कोविड-१९ च्या उद्भवलेल्या पार्श्वभूमीवर, बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या कर्ज वसुलीवर होणारा परिणाम विचारात घेऊन सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी राज्यातील पतसंस्थांसाठी अनुत्पादक जिंदगीच्या निकषात बदल करुन अनुत्पादक जिंदगी ठरविण्याचा प्रचलित असलेला कालावधी सहा महिन्याऐवजी नऊ महिने करण्यात आलेला होता.

तसेच उपरोक्त संदर्भ क्र.३ दि.१/१०/२०२० च्या परिपत्रकान्वये, कोविड-१९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी राज्यातील सहकारी पतसंस्थांकरिता अनुत्पादक जिंदगी (एनपीए) ठरविण्याचा थकीत कालावधी सहा महिन्याऐवजी बारा महिने करण्यात आलेला होता.

उपरोक्त संदर्भ क्र.४ अन्वये दि.१०/३/२०२२ रोजीच्या नियामक मंडळ सभेतील निर्णयानुसार **सन २०२१-२२** या आर्थिक वर्षाकरिता अनुत्पादक जिंदगी (एनपीए) ठरविण्याचा थकीत कालावधी **सहा महिन्याऐवजी नऊ महिने** ठरविण्यात आलेला आहे.

त्यानुसार राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता उत्पादक जिंदगी (Standard Assets) चे अनुत्पादक जिंदगी (Non Performing Assets) मध्ये वर्गीकरण करणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. **दिनांक ३१ मार्च २०२२ अखेर** एन.पी.ए. वर्गीकरण तक्ता खालीलप्रमाणे लागू असेल.

| अ.क्र | वर्गवारी | व्याज किंवा मुद्दल अथवा दोन्ही थकीत कालावधी |
|---|---|---|
| १ | उत्पादक जिंदगी (Standard Assets) | ९ महिने पर्यंत |
| २ | अनियमित कर्ज (Sub-Standard Asset) | ९ महिन्यापेक्षा जास्त परंतु २१ महिन्यापेक्षा कमी |
| ३ | संशयित कर्ज-१ (डी-१) | २१ महिन्यापेक्षा जास्त परंतु ४५ महिन्यापेक्षा कमी |
| ४ | संशयित कर्ज-२ (डी-२) | ४५ महिन्यापेक्षा जास्त परंतु ५७ महिन्यापेक्षा कमी |
| ५ | संशयित कर्ज-३ (डी-३) | ५७ महिन्यांच्या पुढे |
| ६ | बुडीत कर्ज (Loss Asset) | वैधानिक लेखापरीक्षकांचे शिफारशीनुसार |

२. सदर वर्गीकरण निकषाचा कालावधी हा केवळ **सन २०२१-२२** या आर्थिक वर्षाकरिता नव्याने अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए) होणाऱ्या कर्जासाठी लागू राहील.

३. कॅश क्रेडीट किंवा ओव्हरड्राफ्ट कर्ज खात्यांच्या बाबतीत असे खाते ९ महिने सतत नियमबाह्य (Out of Order) असेल तर ते खाते एन पी ए मध्ये समाविष्ट होईल.

४. सहा महिन्यावरील व नऊ महिन्याचे आतील अशी जी कर्जे थकीत असून उत्पादक जिंदगी म्हणून दर्शविली आहेत अशा कर्जखात्यांच्या बाबतीत सहा महिन्यापेक्षा जास्त व नऊ महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठीचे जे व्याज उत्पन्नात घेतले असेल, तर त्यापोटी निव्वळ नफ्यातून किमान २५% किंवा जेवढे व्याज उत्पन्नात घेतले आहे, त्यापैकी जे कमी असेल तेवढ्या रकमेची तरतूद संस्थेच्या दि.३१/३/२०२२ अखेरच्या निव्वळ नफ्यातून करण्यात यावी. सदर तरतूद संस्थेच्या निव्वळ नफ्यातून वैधानिक राखीव निधीची विभागणी केल्यानंतर करण्यात यावी. सदर तरतूदीबाबत संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षक यांनी खात्री करुन लेखापरीक्षण अहवालात त्याबाबत स्पष्ट अभिप्राय नमूद करावेत.

५. सदर अनुत्पादक जिंदगी (एन पी ए) ठरविण्याच्या थकीत कालावधीमध्ये वर्गीकरण कालावधीत झालेला बदल वगळता अन्य निकष संदर्भ क्र.१ मधील परिपत्रकाप्रमाणे कायम राहतील.

राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी अनुत्पादक जिंदगीच्या निकषाबाबत केवळ **सन २०२१-२२** या आर्थिक वर्षाकरिताच वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**(अनिल कवडे)**
**अध्यक्ष, नियामक मंडळ**
**तथा सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग १, सहकारी संस्था (सर्व)
४. अध्यक्ष, सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. (सर्व) (राज्य/जिल्हा/तालुका)
५. अध्यक्ष/व्यवस्थापक, ------------------ नागरी/ग्रामीण बिगरशेती पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.---------- ता.------- जि.-----------

प्रत माहितीस्तव :

१. मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ (सविनय सादर)
२. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था/लेखापरीक्षण), मुख्यालय, पुणे
४. कार्यासन अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान), मुख्यालय, पुणे - यांना संकेतस्थळावर त्वरीत प्रसिद्धीस्तव
५. धारिका संग्रही

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११ ००१
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दुरध्वनी क्रमांक- २६१२९३२१/२६१२२८४६ ई-: मेल- commpat२०१८@gmail.com

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/नि.मं/लेप.वर्ग/निकष शिथिल/सन २०२२ 816 दि. १६/०३/२०२२

## परिपत्रक

**विषय : कोविड-१९ च्या अनुषंगाने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीबाबत निर्धारीत केलेले निकष शिथिल करणेबाबत.**

**संदर्भ :** १) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि.२९/४/२०१० रोजीचे परिपत्रक
२) महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचेकडील दि.१/१०/२०२० रोजीचे परिपत्रक.
३) महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ सभा दि.१०/३/२०२२ मधील निर्णय.

उपरोक्त संदर्भ क्र.१ चे परिपत्रकान्वये, राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी ६०० गुणांचे व पगारदार कर्मचारी पतसंस्थांसाठी २०० गुणांचे वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी निकष निर्धारित केलेले असून सदरचे निकष हे या संस्थांसाठी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आलेले आहेत.

नागरी/ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांसाठी भांडवल पर्याप्तता, जिंदगीची गुणवत्ता, व्यवस्थापन, उत्पन्न (नफा), तरलता, कार्यपद्धती व नियंत्रण या सहा घटकांना मिळालेल्या गुणांचे वेटेड ॲव्हरेज (Weighted Average) च्या आधारे वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी ठरविण्यात आलेली असून पगारदार कर्मचारी पतसंस्थांकरिता याच घटकांचे आधारे प्राप्त होणाऱ्या गुणांकानुसार वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी निकष निर्धारित करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र.२ दि.१/१०/२०२० च्या परिपत्रकानुसार, कोविड-१९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक स्थितीवर, कर्ज वसुलीवर व एकंदरीत वरील नमुद सहा घटकांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विपरीत परिणाम झाल्याने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीच्या निकषांमध्ये नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी वेटेड ॲव्हरेज (Weighted Avergage) काढल्यानंतर मिळणारे गुण दहा प्रमाणे कमी व पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थासाठी १०% प्रमाणे वर्गवारीची पायरी कमी करण्याबाबत नियामक मंडळाच्या सभेत निर्णय घेण्यात आलेला होता.

उपरोक्त संदर्भ क्र.३ अन्वये, नियामक मंडळ सभा दि.१०/३/२०२२ रोजीच्या निर्णयानुसार, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरितासुद्धा वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी गुणांकन निकष खालीलप्रमाणे शिथिल करणेचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे सुधारीत गुणांकन निकष :-**

| अ.क्र | वेटेड ॲव्हरेज (Weighted Average) | लेखापरीक्षण वर्ग |
|---|---|---|
| १ | ६५ व त्याचेवर गुण असल्यास | अ |
| २ | ५१ ते ६४ पर्यंत गुण असल्यास | ब |
| ३ | ४१ ते ५० पर्यंत गुण असल्यास | क |
| ४ | ४० पर्यंत गुण असल्यास | ड |

**पगारदार कर्मचारी पतसंस्थांसाठी वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे सुधारीत गुणांकन निकष :-**

| अ.क्र | मिळालेले गुण (टक्केवारी) | लेखापरीक्षण वर्ग |
|---|---|---|
| १ | ६५ % व त्याचेवर गुण असल्यास | अ |
| २ | ५१ % ते ६४ % पर्यंत गुण असल्यास | ब |
| ३ | ४१ % ते ५० % पर्यंत गुण असल्यास | क |
| ४ | ४० % पर्यंत गुण असल्यास | ड |

याव्यतिरिक्त अन्य कोणताही बदल संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकातील निकषामध्ये करण्यात आलेला नाही.

राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांकरिता वरीलप्रमाणे वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी सुधारीत गुणांकन निकष हे केवळ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिताच लागू राहतील.

**(अनिल कवडे)**
**अध्यक्ष, नियामक मंडळ**
**तथा सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व विभाग)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था (सर्व )
४. अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापक, सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. (सर्व) (राज्य/जिल्हा/तालुका)
५. अध्यक्ष/व्यवस्थापक, ------------------ नागरी/ग्रामीण बिगरशेती पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.---------- ता.------- जि.-----------

प्रत माहितीस्तव :

१. मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ (सविनय सादर)
२. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था/लेखापरीक्षण), मुख्यालय, पुणे
४. कार्यासन अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान), मुख्यालय, पुणे - यांना संकेतस्थळावर त्वरीत प्रसिद्धीस्तव
५. धारिका संग्रही

महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे कार्यालय**
**नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**
दुरध्वनी क्रमांक- २६१२९३२१/२६१२२८४६ ई-: मेल- commpat२०१८@gmail.com

जा.क्र.पतसंस्था/सआ/नि.मं.सभा/पतसंस्था व्याजदर/सन २०२२ 1825 दि. ११/०७/२०२२

परिपत्रक

विषय : नियामक मंडळ बैठक दि.८/६/२०२२ मधील निर्णयाबाबत..
ठेवी व कर्जावरील व्याजदराबाबत..

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.मुंबई यांनी पतसंस्था नियामक मंडळाकडे बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या ठेवीचे व कर्जाचे व्याजदरात वाढ करणेबाबत दि.२८/४/२०२२ रोजीच्या निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने वेळोवेळी देशाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन रेपो रेट व रिव्हर्स रेपो रेट वाढ करुन अनुक्रमे ४.९० % व ३.७५ % इतका केलेला आहे. या बदलामुळे राष्ट्रीयीकृत बँकांचे/सहकारी बँकांचे/खाजगी बँकांचे कर्ज व्याजदरात वाढ झालेली आहे. वरीलप्रमाणे फेडरेशनने दिलेल्या निवेदनाबाबत व रिझर्व्ह बँकेचा निर्णय पहाता, दि.८/६/२०२२ रोजीच्या नियामक मंडळाच्या सभेत याबाबत सविस्तर/साधकबाधक चर्चा होऊन बिगर कृषी पतसंस्थांचा ठेवीवरील कमाल व्याजदर १० % आणि तारणी कर्जाचा १४ % व विनातारणी कर्जाचा १६ % कमाल व्याजदर ठेवणेत यावा, असे ठरविणेत आले आहे.

नियामक मंडळाच्या दि.८/६/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे राज्यातील सर्व बिगर कृषी पतसंस्थांनी त्याची अंमलबजावणी करावी.

**ठेवी, तारणी व विनातारणी कर्जावरील व्याजदर :**

१) नागरी/ग्रामीण/कर्मचारी बिगर कृषी सहकारी पतसंस्थांमधील ठेवीवर द्यावयाचा कमाल व्याजदर १० % राहील.

२) नागरी/ग्रामीण बिगर कृषी सहकारी पतसंस्थांमधील तारणी कर्जावरील **कमाल** व्याजदर १४ % राहील.

३) नागरी/ग्रामीण बिगर कृषी सहकारी पतसंस्थामधील विनातारणी कर्जावरील **कमाल** व्याजदर १६ % राहील.

४) पगारदार कर्मचारी बिगर कृषी सहकारी पतसंस्थेचा कर्जावरील **कमाल** व्याजदर खालीलप्रमाणे राहील.

अ) संस्था स्वनिधीतून कर्ज वाटप करीत असल्यास कमाल कर्ज व्याजदर १२ % राहील.

ब) संस्था इतर वित्तीय संस्थेकडून कर्ज घेत असल्यास अशा वित्तीय संस्थेने ज्या दराने संस्थेस कर्ज दिले आहे त्या व्याजदराच्या २ % पेक्षा अधिक सभासदांना द्यावयाचा कर्जाचा व्याजदर असणार नाही.

तरी राज्यातील पतसंस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) उपरोक्त नमूद कमाल मर्यादेच्या अधीन राहून राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी त्यांचे ए.बी.आर व ए.एल.आर. विचारात घेऊन ठेवीवरील व कर्जावरील व्याजदर ठरवावेत.

२) सदरचे व्याजदर हे दि.१/७/२०२२ पासून या संस्थांनी स्विकारलेल्या ठेवींस व दिलेल्या कर्जास लागू राहतील.

३) संस्थेच्या उपविधीमध्ये काहीही नमूद असले तरी नियामक मंडळ वेळोवेळी जाहीर करेल त्याप्रमाणे ठेवी व कर्जावरील **कमाल** व्याजदर सर्व बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना बंधनकारक राहतील.

**(अनिल कवडे)**
**अध्यक्ष, नियामक मंडळ**
**तथा सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
आपले कार्यक्षेत्रातील सर्व बिगर कृषी सहकारी पतसंस्था व फेडरेशन यांना कळविण्यात यावे.
३) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या.मुंबई
सीटीसी क्र.११९/बी, तिसरा मजला, प्रमिला अपार्टमेंट, लकाकी बंगलाशेजारी, लकारी रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
४) अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.मुंबई
६/६०३, दुर्गा कृषा को-ऑप हौसिंग सोसायटी, हनुमान चौक, नवघर रोड, मुलुड (पू) मुंबई ४०००८१
५) सर्व जिल्हा/विभागीय फेडरेशन्स --------------
६) कार्यासन अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान), मुख्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर त्वरीत प्रसिद्धीस्तव
७) धारिका संग्रही

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे कार्यालय
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
दुरध्वनी क्रमांक- २६१२९३२१/२६१२२८४६ ई-: मेल- commpat२०१८@gmail.com

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/नि.मं./सन २०२२ २५११ दि. २३/०८/२०२२

# परिपत्रक

## विषय:- बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना भांडवल निधीचे (स्वनिधीचे) चे जोखीम भारीत मालमत्ता/जिंदगीशी असलेले प्रमाण (सीआरएआर) लागू करणेबाबत ..

पतसंस्थांचे भांडवल निधी (स्वनिधी) हे संस्थेच्या आर्थिक अडचणीच्या वेळी किंवा आपत्कालीन स्थितीमध्ये आघात प्रतिबंधक (buffer) म्हणून कार्य करीत असतात. संस्थेकडे असलेल्या पुरेशा भांडवल निधीमुळे संस्थेच्या ठेवीदारांची विश्वासार्हता वाढण्यास मदत होते. संस्थेच्या विविध मालमत्ता काही प्रमाणात जोखमीच्या असतात व जोखीम पेलण्याइतपत पुरेसे भांडवल संस्थेकडे असणे आवश्यक आहे. संस्थेच्या मालमत्तेवर जोखीमनुसार (रिस्क वेटेजनुसार) संस्थेला किती भांडवल निधी (स्वनिधी) लागेल याची माहिती सीआरएआर या संकल्पनेवरून समजते.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३५ नुसार संस्थेस बाहेरील कर्ज किंवा सभासदाकडून ठेवी स्विकारणेच्या मर्यादेचे प्रमाण निश्चित केले आहे. संस्थेचे वसूल भाग भांडवल, संचित राखीव निधी व इमारत निधी यातून संचित तोट्याच्या रकमा वजा जाता शिल्लक राहिलेल्या एकूण रकमेच्या बारा पटीपेक्षा अधिक होईल इतक्या रकमेची जबाबदारी कोणतीही पतसंस्था पत्करणार नाही. तद्वतच संस्थेच्या ताळेबंदातील मालमत्ता/जिंदगी बाजू देखील त्याच मर्यादेत राहते. रिझर्व बँकेने नागरी सहकारी बँकांना, भांडवल निधीचे जोखीम भारीत जिंदगीशी असलेले प्रमाण (सीआरएआर) नऊ टक्के इतके ठेवण्याबाबत सूचित केलेले आहे.

त्याच पद्धतीने, पतसंस्थांमधील सभासद येणे कर्ज या प्रमुख व इतर सर्व अन्य मालमत्तेतील असलेली जोखीम विचारात घेता पतसंस्थानासुद्धा 'सीआरएआर' हा निकष लागू करणे आवश्यक आहे. पतसंस्थाना हे निकष लागू करणेबाबत नियामक मंडळाच्या बैठकीत सूचित केले आहे. ज्या संस्थेच्या जिंदगीचा/मालमत्तेचा दर्जा उत्तम आहे व भांडवल निधीचे (स्वनिधीचे) जोखीम भारीत मालमत्ता/जिंदगीशी असलेले प्रमाण (सीआरएआर) नऊ टक्केपेक्षा अधिक आहे अशी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम समजण्यात येते. संस्थेचे कार्यक्षेत्र वाढ किंवा संस्थेचा शाखाविस्तार करताना व 'आर्थिकदृष्ट्या सक्षम व उत्तम व्यवस्थापन (FSWM)' याबाबतचे निकष ठरविताना आणि संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी गुणांकन तक्त्यामध्ये अन्य निर्धारित केलेल्या निकषांबरोबरच 'सीआरएआर' या निकषाचा प्राधान्याने विचार करणे आवश्यक आहे .

संस्थेच्या भांडवल निधी (स्वनिधी) चे जोखीम भारीत मालमत्ता/जिंदगीशी असणारे प्रमाण ( सीआरएआर ) पतसंस्थांनी कशा पद्धतीने काढावे याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत :-

१. स्वनिधी काढतांना खालीलप्रमाणे (अ) मधून (ब) या बाबी वजा कराव्यात.

स्वनिधी = (अ) - (ब)

(अ) मध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.

(१) वसूल भागभांडवल
(२) राखीव निधी
(३) इमारत निधी
(४) लाभांश समीकरण निधी
(५) गुंतवणूक चढ-उतार निधी
(६) उत्तम जिंदगी/उत्पादक कर्जावरील तरतूद
(७) शिल्लक नफा (मागील शिल्लक नफा + चालू वर्षातील नफ्यातून अंदाजित लाभांश वजा जाता शिल्लक नफा )
(८) एनपीए ज्यादा तरतूद (केली असल्यास )

(ब) मध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा
(१) संचित तोटा
(२) कमी केलेली एनपीए तरतूद
(३) कमी केलेली थकव्याज तरतूद
(४) कराव्या लागणाऱ्या परंतु न केलेली खर्चाची तरतूद

२. जोखीम भारीत जिंदगीचे मूल्य :- म्हणजे संस्थेच्या ताळेबंदातील मालमत्ता/जिंदगी बाजूकडील प्रत्येक मालमत्तेतील असलेली जोखीम विचारात घेऊन विविध दराने आकारणी करून येणाऱ्या जिंदगीचे मूल्य होय.

३. सीआरएआर (भांडवल निधीचे/स्वनिधीचे जोखीमभारीत मालमत्ता/जिंदगीशी असलेले प्रमाण) = संस्थेचा स्वनिधी भागिले संस्थेची जोखीम भारीत मालमत्ता/जिंदगी मूल्य X १००

संस्थेच्या ताळेबंदातील विविध प्रकारच्या मालमत्ता / जिंदगीचे जोखीम मूल्य

| अ क्र | ताळेबंदातील मालमत्ता/जिंदगी घटक | येणेबाकी शिल्लक रक्कम रुपये | जोखीम भार (रिस्क वेटेज) टक्के | जोखीम भारीत मालमत्ता / जिंदगी मूल्य |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ = (३ x४)/१०० |
| १ | रोख शिल्लक | | ० | |
| २ | जि.म.सह.बँकेतील व इतर बँकातील (कलम ७० प्रमाणे) शिल्लक रकमा | | | |
| | अ) चालू ठेव खाते | | २० | |
| | ब) बचत ठेव खाते | | २० | |
| ३ | इतर अन्य ( कलम ७० व्यतिरिक्त ) संस्थेतील शिल्लक | | | |
| | अ) चालू ठेव खाते | | १०० | |
| | ब) बचत ठेव खाते | | १०० | |
| | क)अन्य पतसंस्था/मल्टीस्टेट संस्थातील शिल्लक | | १०० | |
| ४ | गुंतवणूक | | | |
| | अ)जि.म.सह. बँक भागातील गुंतवणूक | | २० | |
| | ब) इतर सहकारी संस्थांच्या भागातील गुंतवणूक | | १०० | |
| | क)जि.म.सह. व इतर बँकातील (कलम ७० | | २० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रमाणे) मुदत ठेवी | | | |
| | ड) सरकारी रोखे | | २.५ | |
| | इ) अन्य रोखे/बॉंडस् / लिक्विड फंड गुंतवणूक | | १०२.५ | |
| | ई) पोस्टल एनएससी/केव्हीपी मधील गुंतवणूक | | २.५ | |
| | उ) कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची बँकेच्या ठेवीमध्ये/भविष्यनिर्वाह निधी ट्रस्टमध्ये केलेली गुंतवणूक | | २० | |
| | ऊ) इतर अन्य सर्व (मल्टीस्टेट व राज्य नोंदणीकृत) पतसंस्थांमधील ठेवी | | १०० | |
| | ए)सह.साखर कारखाने,सूत गिरण्या,प्रक्रिया संस्था, इतर सर्व प्रकारच्या (सहकारी संस्था / शैक्षणिक/धर्मादाय संस्था इ.)संस्थामधील गुंतवणूक | | १२५ | |
| | ऐ) बंद पडलेल्या सह. बँका/ पतसंस्थातील गुंतवणूक-पूर्ण तरतूद व्याजासह केली नसल्यास | | १२५ | |
| | ओ) बंद पडलेल्या सहकारी बँका/ पतसंस्थामधील गुंतवणूक संपूर्ण तरतूद व्याजासह केली असल्यास | | ० | |
| ५ | कर्जे व अग्रीमे | | | |
| | अ) ठेव तारण/एलआयसी तारण/एनएससी तारण इत्यादी | | ० | |
| | ब) वैयक्तिक जामिनकी/विनातारणी कर्जे | | १२५ | |
| | क) कर्मचारी कर्जे | | २० | |
| | ड)रु.२.०० लाखापर्यंतची सोने तारण कर्जे | | ५० | |
| | इ) रु.३० लाख पर्यंतची गृह तारण हौसिंग कर्जे | | ५० | |
| | ई) इतर सर्व प्रकारची अल्प,मध्यम व दीर्घ मुदत तारणी कर्जे | | १०० | |
| ६ | स्थावर मालमत्ता | | | |
| | अ)जमीन, इमारत | | १०० | |
| | ब) डेडस्टॉक/फर्निचर, संगणक, संगणक प्रणाली, इलेक्ट्रीक साहित्य इत्यादी | | १०० | |
| | क)वाहने | | १०० | |
| ७ | इतर मालमत्ता | | | |
| | अ ) गुंतवणुकीवरील येणे व्याज | | २० | |
| | आ) कर्जावरील येणे व्याज | | १०० | |
| | इ) भांडवली खर्च (जागा/इमारत खरेदी /बांधकाम)ॲडव्हान्स | | १२५ | |
| | ई) तसलमात /ॲडव्हान्स येणे रकमा | | १२५ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | उ) शिल्लक स्टेशनरी | | १०० | |
| | ऊ) इतर येणे रकमा | | १०० | |
| | ऋ)टीडीएस,डीपॉझीट,जीएसटी, आयकर,येणे रकमा | | १०० | |
| ८ | दुबेरजी रकमा | | ० | |
| | एकूण जोखीम भारीत मालमत्ता /जिंदगी | | | |

सुत्र :-

भांडवल निधी (स्वनिधी)चे जोखीम भारीत मालमत्ता/जिंदगीशी असलेले प्रमाण = भांडवल निधी (स्वनिधी) भागिले एकूण जोखीम भारीत मालमत्ता किंवा जिंदगी मूल्य X १००

उपरोक्तप्रमाणे परिगणना करताना कोष्टक क्र. ३ मध्ये नमूद करण्यात आलेली मालमत्ता/जिंदगीची एकूण रक्कम ही संस्थेच्या ताळेबंदातील एकूण मालमत्ता/ जिंदगी बाजूशी जुळणे आवश्यक आहे. यामध्ये केवळ दुबेरजी रकमा (जसे की थकव्याज,शाखा जुळवणी) वजा करणे आवश्यक आहे.

तरी राज्यातील सर्व बिगर कृषी सहकारी पतसंस्थाना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून 'सीआरएआर' चे प्रमाण नऊ टक्केप्रमाणे लागू करण्यात येत आहे. राज्यातील सर्व बिगर कृषी पतसंस्थांनी याची नोंद घेऊन या निकषाचे काटेकोरपणे पालन करावे.

**(अनिल कवडे)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य बिगर कृषी नियामक मंडळ तथा**
**सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**

१) विभागीय सहनिबंधक ,सहकारी संस्था (सर्व विभाग )(प्रशासन/लेखापरीक्षण )
२) जिल्हा उपनिबंधक ,सहकारी संस्था (सर्व जिल्हे )
३) जिल्हा विशेष लेखापरीक्षक ,सहकारी संस्था (सर्व जिल्हे )
४) अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी,--------------------------------------------------------(सर्व पतसंस्था फेडरेशन) (राज्य/विभाग/जिल्हा /तालुके )
५) अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापक /सचिव,-------------------नागरी/ ग्रामीण /पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.,----------------- तालुका ------------ जिल्हा --------
६) कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान शाखा, मुख्यालय ,पुणे ( कार्यालय संकेतस्थळावर प्रसिद्धीस्तव)
७) धारिका संग्रही

**प्रत माहितीस्तव**

१. मा. अपर मुख्य सचिव (सहकार व पणन), मंत्रालय , मुंबई ३२
२. अपर आयुक्त व विशेष निबंधक ,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था), महाराष्ट्र राज्य, पुणे



Rchumbalkar

सहकारी संस्थांचे वैधानिक
लेखापरीक्षण अहवाल मराठी
भाषेत सादर करणेबाबत...

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**नविन मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे कार्यालय**
**जाक्र. सआ/लेखापरीक्षण/लेखापरीक्षण अहवाल/मराठी भाषा /५९९ /२०२१ दि. २१/०५/२०२१**

**-: परिपत्रक :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ अन्वये, संस्था प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा आपल्या लेख्यांचे लेखापरीक्षण करील, अशी तरतुद असुन लेखापरीक्षणासाठी नामतालिकेतुन पात्र लेखापरीक्षकांची नेमणुक करण्याची स्वायतत्ताही संस्थांना प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच अधिनियमातील कलम ७५(२अ) अन्वये संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेद्वारे राज्यस्तरीय लेखापरीक्षकाच्या नामतालिकेतुन वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणुक करण्याची तरतुद आहे. तसेच कलम ८१ (५)(ब) नुसार संबंधित लेखापरीक्षक लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन एक महिन्याचे आत किंवा कोणत्याही परिस्थितीत वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीस निर्गमनापुर्वी संस्थेस व निबंधकास लेखापरीक्षण अहवाल सादर करील अशी तरतुद आहे.

संस्थेची आर्थिक व सांपत्तिक स्थिती, संस्थेच्या कामकाजातील अनियमितता व गंभीर बाबी वेळीच निष्पन्न होणेसाठी, संस्था अधिनियम, नियम व पोटनियमान्वये यथोचितरित्या कामकाज पार पाडत असल्याचे निबंधक व सभासदांच्या निदर्शनास येणेसाठी व संस्थांच्या कामकाजात गुणात्मक सुधारणा होणेसाठी वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे महत्व अनन्यसाधारण आहे. संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग व लेखापरीक्षकाचे लेखापरीक्षण अहवालातील अभिप्राय यावर जनतेमधील संस्थेची विश्वासार्हता अवलंबुन असते. अधिनियमातील कलम ७५(२) अन्वये लगतच्या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सभासदांच्या मान्यतेसाठी संस्थेच्या वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये ठेवण्यात येतो, ही बाब अधिनियमान्वये देखील अनिवार्य असल्याने लेखापरीक्षण अहवालाचे महत्व अधोरेखीत होते.

राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांमध्ये सामान्य जनतेतील व्यक्ती या सभासद, ठेवीदार, कर्जदार व अन्य हितसंबंध असलेल्या व्यक्ती असुन या बहुतांशी व्यक्ती मराठी भाषिक आहेत. त्यामुळे लेखापरीक्षण अहवालाचे पर्यायाने संस्थेच्या आर्थिक परिस्थितीचे आकलन होण्यासाठी लेखापरीक्षण अहवाल मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. तथापि राज्यातील अनेक सहकारी संस्थांच्या बाबतीत संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवाल हे संस्था व निबंधकास सादर करताना ते मराठी भाषेत सादर न करता इंग्रजी भाषेत सादर केले जात असल्याचे निदर्शनास येते. तसेच इंग्रजी भाषेतील वैधानिक लेखापरीक्षण अहवालामुळे संस्थांचे अधिकारी पदाधिकारी यांनांही सदरच्या लेखापरीक्षण अहवालावरुन संस्थेच्या आर्थिक स्थितीची तसेच संस्थेच्या गुण दोषांची वस्तुस्थिती बाबत आकलन होण्यास अडचणी निर्माण होतात, पर्यायाने लेखापरीक्षण अहवालातील दोषांची पुर्तता करताना अनेक अडचणी उद्भवतात.

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करणेबाबत परिपत्रकीय निर्देश दिलेले आहेत. अलीकडेच महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या दि.०७/०५/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार शासकीय कार्यालयाने सर्वसामान्य जनतेशी होणारा पत्रव्यवहार व इतर कार्यालयीन कामकाज मराठीतुन करण्याची खबरदारी घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सहकारी संस्थांचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल संस्थेचे संचालक मंडळ, संस्थेचे कर्मचारी, संस्थेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांचेशी निगडित असल्याने व या सर्व व्यक्ती सर्वसामान्य जनतेचा घटक असल्याने, वैधानिक लेखापरीक्षण

Scanned with Cal

अहवालातील सर्व गुण दोषांचे तसेच संस्थेच्या आर्थिक परिस्थितीचे सुलभ अवलोकन होण्यासाठी लेखापरीक्षण अहवाल मराठी भाषेत असणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम ८१ (ग) मधील स्पष्टीकरण '१' नुसार नामतालिकेवरील लेखापरीक्षकांची अर्हता निर्धारीत करण्यात आलेली असुन त्यान्वये सर्व लेखापरीक्षकांना मराठी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य आहे. त्या अनुषंगाने मराठी भाषेचे ज्ञान असलेल्या लेखापरीक्षकांनाच नामतालिकेवर नोंदणीकृत केले जाते. अधिनियमातील सदर तरतुद विचारात घेता संबंधीत लेखापरीक्षकांना सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल मराठी भाषेत सादर करणे शक्य आहे.

महाराष्ट्र शासनाने मराठी भाषा वापराबाबत वेळोवेळी दिलेले निर्देश, राज्यातील सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणास असणारे महत्व, लेखापरीक्षण अहवालातील माहीतीनुसार संस्थेच्या पदाधिकारी, कर्मचारी, ठेवीदार, कर्जदार व संस्थेच्या हितचिंतकांना संस्थेच्या आर्थिक स्थितीचे व गुणदोषांचे योग्य ते आकलन होणे सुलभ व्हावे या हेतूने, तसेच मराठी भाषा वापराबाबतच्या शासनाच्या भूमिकेस अनुसरुन व वैधानिक लेखापरीक्षण अहवालांवर निबंधक कार्यालयातील प्रक्रिया सुलभ होण्याचे अनुषंगाने तसेच सहकार चळवळीच्या निकोप वाढीसाठी सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल मराठी भाषेत सादर करणेबाबत या परिपत्रकाद्वारे निर्देश देण्यात येत आहे. राज्यस्तरीय लेखापरीक्षकांच्या नामतालिकेवरील संबंधित सर्व लेखापरीक्षकांनी सहकारी संस्थांच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण अहवाल व यापुढील कालावधीचे सर्व वैधानिक लेखापरीक्षण अहवाल संस्थेस व निबंधकास सादर करतांना ते मराठी भाषेत सादर करण्यात यावेत. तथापी, ज्या सहकारी संस्थांच्या बाबतीत सभासदांनी लेखापरीक्षण अहवाल इंग्रजी भाषेत सादर करणेची मागणी, लेखापरीक्षक नियुक्तीच्या ठरावावेळी केली असल्यास, केवळ अशा संस्थांच्या बाबतीतच वैधानिक लेखापरीक्षण अहवाल इंग्रजी भाषेत सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

राज्यातील नागरी सहकारी बँकांचे बहुसंख्य सभासद व ठेवीदार मराठी भाषिक असल्याने या बँकांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवाल निबंधकास व बँकेस सादर करताना ते मराठी भाषेत सादर करावेत. तसेच रिझर्व्ह बँकेस सादर करावयाच्या लेखापरीक्षण अहवालाच्या प्रतीबाबत रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.

(अनिल कवडे)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत पुढील उचित कार्यवाही व उपाययोजनेस्तव -**

१. मा. अध्यक्ष राज्यस्तरीय लेखा समिती, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. साखर आयुक्त, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५
३. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. दुग्ध विकास आयुक्त, वरळी दुध डेअरी, वरळी मुंबई.
५. मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन लाईन मुंबई.
६. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन, लेखापरीक्षण) सर्व
८. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई.
९. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१०. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)

Scanned with Cal

११. उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) मुंबई.

१२. इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (WIRC), आय. सी.ए.आय. टॉवर, प्लॉट नं. सी.-४०, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पुर्व), मुंबई – ४०० ०५१.

१३. इन्स्टिट्युट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (WIRC), रोहित चेंबर्स, ४ था मजला, जन्मभुमी मार्ग, फोर्ट मुंबई ४०० ००१.

१४.प्रमाणित लेखापरीक्षकांच्या संघटना

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर -</u>

१. मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय, मुंबई .

Scanned with Cal